करोना २०२०/सूचना/आदेश क्र. १३९

महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय रायगड-अलिबाग

दुरध्वनी क्रमांक :- ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२००१ फॅक्स क्रमांक: ०२१४१-२२२०२५/२२७४५१

Email :collector_raigad@maharshtra.gov.in Email dcraigad@gmail.com

क्र.साशा/कार्या-१/ब-५/आ.व्य./करोनाविषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/२०२० दि.२० /०३/२०२०

**अतितात्काळ**

प्रति,

१. कामगार उपायुक्त रायगड
२. उपविभागीय अधिकारी सर्व
३. तहसिलदार सर्व

**विषय:- जिल्हयामध्ये संचारबंदी काळात अडकून पडलेल्या कामगार व सद्यस्थितीत जिल्हयामध्ये चालू असलेल्या कंपन्यामध्ये समन्वय साधून त्यांना काम मिळवून देणेबाबत.**

जागतिक आरोग्य संघटनेने करोना विषाणू संक्रमण हा जागतिक साथीचा रोग (World Pandemic) घोषित केलेला आहे. करोना विषाणूचा संसर्ग टाळण्यासाठी राज्यामध्ये संपूर्ण संचारबंदी लागू करण्यात आलेली आहे. जिल्हयामध्ये महाराष्ट्र राज्याच्या इतर भागातून व अन्य राज्यामधून कामानिमित्त आलेले कामगार आहेत. यातील काही कामगार संचारबंदी लागू होण्यापूर्वी आपापल्या मूळ गावी परत गेले आहेत. परंतू काही कामगार हे जिल्हयात अडकून पडलेले आहे. जिल्हयाच्या सिमा बंद केल्यामुळे कामगार आपल्या मूळ गावी परत जाऊ शकलेले नाहीत. शिवाय हे कामगार ज्या ठिकाणी काम करत आहेत त्या आस्थापना देखील बंद आहेत. प्रशासनातर्फे त्यांचा जेवणाचा/राहण्याचा प्रश्न सोडवण्यात आलेला आहे. परंतु सद्यस्थितीत त्यांच्या हातावर कोणतेही काम नाही.

त्या अनुषंगाने आपले तालुक्यात आढळून येणा-या कामगारांशी समन्वय साधून सद्यस्थितीत चालू असणा-या कंपन्यांमध्ये मनुष्यबळाची आवश्यकता मोठया प्रमाणात असल्याने हया कामगारांना अशा कपंन्यामध्ये तात्पुरत्या स्वरुपात काम देण्याबद्दल कंपनील कळवावे. याबाबत आपलेस्तरावरुन कामगार व कंपनी यामध्ये समन्वय साधून पाठपुरावा करण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**(निधी चौधरी)**
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**रायगड - अलिबाग**

प्रत : - १) मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांसकडे माहितीसाठी सादर.
२) मा. सहसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचलनालय मुंबई यांसकडे माहितीसाठी सादर



Scanned with CamScanner